# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.०४/का-११
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ नोव्हेंबर, २०२१

वाचा: आयोगाचे समक्रमांकाचे दि.२० ऑक्टोबर २०१६ रोजीचे आदेश.

## अधिसूचना

राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९. (सुधारीत २०१६- पुन:सुधारीत २०२१)

**ज्याअर्थी,** राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ (सुधारीत २०१६), दि.२० ऑक्टोबर २०१६ अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या राजकीय पक्षांनी सादर करावयाचे अहवाल, विवरणपत्रे इत्यादीबाबत कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे,

**आणि ज्याअर्थी,** सदर आदेशातील परिच्छेद ८.१ मध्ये राजकीय पक्षांनी स्वतंत्र बँक खाते उघडणे, निधी स्वीकारणे व खर्च करणे इत्यादी याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत,

**आणि ज्याअर्थी,** सदर निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी शेड्यूल बँकेमध्ये प्रत्येक महानगरपालिकेकरिता एक स्वतंत्र खाते तसेच, इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडणे अनिवार्य करण्यात आलेले आहे,

**आणि ज्याअर्थी,** ठराविकच जिल्ह्यात तसेच मर्यादित ठिकाणीच निवडणुका लढविणाऱ्या राजकीय पक्षांसाठी अशाप्रकारे स्वतंत्र बँक खाते उघडणे व त्यामार्फत आर्थिक व्यवहार करणे जिकरीचे व अव्यवहार्य असल्याने, अशा ठिकाणी स्वतंत्र बँक खाते उघडण्याच्या अटीतून सूट मिळावी, याबाबत काही राजकीय पक्षांनी आयोगाकडे निवेदने सादर केली आहेत,

**त्याअर्थी,** अशा निवेदनांचा विचार करून आणि आयोगास प्राप्त असलेल्या संविधानात्मक अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग उक्त संदर्भांकित दि.२० ऑक्टोबर २०१६ चे आदेश खालीलप्रमाणे अंशत: सुधारीत करीत आहे:-

ज्या राजकीय पक्षांकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांना/ स्थानिक पातळीवरील संबंधित पक्ष कार्यालयास निवडणूक निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही, अशा पक्षांना केवळ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपुरता संबंधित ठिकाणी स्वतंत्र बँक खाते उघडण्याच्या निर्देशातून खालील अटींवर सूट देण्यात येत आहे:-

(१) *अशी मागणी करणाऱ्या पक्षाने संबंधित ठिकाणच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीचा नामनिर्देशनपत्र स्वीकृतीचा टप्पा पूर्ण होण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगासह संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांना लेखी निवेदन देणे आवश्यक असेल.* ***(या कालमर्यादेनंतर प्राप्त होणाऱ्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही.)***

(२) *अशा पक्षामार्फत निवडणूक लढविलेल्या उमेदवाराने सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या तपशिलात सदर पक्षाने उमेदवारास निवडणूक निधी उपलब्ध करून दिल्याबाबतचा उल्लेख केल्याचे आढळल्यास अथवा याबाबत काही तक्रार प्राप्त झाल्यास आयोगाकडून याबाबतची चौकशी व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.*

वरील दोन्ही अटी मान्य असल्याबाबत संबंधित पक्षाने त्यांच्या निवेदनात नमूद करणे अनिवार्य असेल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंबई.
३. सचिव, विधी मंडळ, विधानभवन, मुंबई.
४. प्रधान सचिव, वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, २५,मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मंबई.
६. सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मंबई.
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. मुख्याधिकारी नगरपरिषदा/ नगरपंचायती (सर्व)
१२. राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष/ राज्यस्तरीय पक्ष व नोंदणीकृत राजकीय पक्ष
१३ आयोगातील सर्व कार्यासने
१४ निवड नस्ती.